आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - संध्याकाळी ७.०० वाजता

१२ जुलै २०२४ - शुक्रवार

**ठळक बातम्या**

- विधानपरिषदेच्या अकरा जागांसाठीची मतमोजणी सुरु, भाजपाचे पंकजा मुंडे, परिणय फुके, आणि, योगेश टिळेकर तसंच राष्ट्रवादी काँग्रेसचे राजेश विटेकर आणि शिवाजीराव गर्जे यांची निवड निश्चित.

- दोन वर्षात महायुती सरकारनं रखडलेले प्रकल्प मार्गी लावत सगळ्या क्षेत्रात लक्षणीय कामगिरी केल्याचं उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचं विधानपरिषदेत प्रतिपादन

- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी उद्या मुंबई दौऱ्यावर/ २९ हजार ४०० कोटी रुपये खर्चाच्या पायाभूत सुविधा प्रकल्पांचं करणार उद्घाटन आणि लोकार्पण

- २५ जून संविधान हत्या दिन म्हणून घोषित

**आणि**

- पुण्यात झिकाचे १८ रुग्ण

**<><><><><><>**

विधान परिषदेच्या आज झालेल्या निवडणुकीत महायुतीचे सर्व ९ उमेदवार विजयी झाले. महाविकस आघाडीचे ३ पैकी १ उमेदवारी विजयी झाला असून आणखी एक निकाल शिल्लक आहे.

विधान परिषदेच्या ११ जागांसाठी आज विधान सभेच्या सर्व २७४ आमदारांनी मतदान केले. त्यातून भाजपकडून पंकजा मुंडे, परिणय फुके, सदाभाऊ खोत, योगेश टिळेकर आणि अमित गोरखे विजयी झाले. राष्ट्रवादी काँग्रेसकडून राजेश विटेकर आणि शिवाजीराव गर्जे यांनी, तर शिवसेनेकडून माजी खासदार कृपाल

तुमाणे आणि भावना गवळी, काँग्रेसकडून प्रज्ञा सातव यांनी निवडनुकित विजय मिळवला.
११ पैकी १० जागांचे निकाल लागले असून उरलेल्या एका जागेसाठी
शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे मिलिंद नार्वेकर आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या पाठिंब्याने निवडणूक लढवत असलेल्या शेकापाचे जयंत पाटील यांच्यात चढाओढ आहे. आतापर्यंत हाती आलेल्या मतानुसार नार्वेकर आघाडीवर आहेत.

**<><><><><><>**

दोन वर्षात राज्यातल्या महायुती सरकारनं रखडलेले प्रकल्प मार्गी लावत सर्वच क्षेत्रात लक्षणीय कामगिरी केली आहे, असं उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज विधानपरिषदेत सांगितलं. अंतिम आठवडा प्रस्तावासह इतर प्रस्तावांवरील चर्चेला ते उत्तर देत होते.
गेल्या दोन वर्षात राज्य सरकारनं एक लाख ३४७ कोटी रूपये मूल्याच्या १२३ सिंचन प्रकल्पांना मान्यता दिली यामुळे १६ लाख ५७ हजार हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली येणार आहे, अशी माहिती त्यांनी दिली. मागेल त्याला सौरपंप, ८४ लाख कापूस आणि सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांचे चुकारे,या कामांचा उल्लेख फडणवीस यांनी केला.
मुंबईच्या रस्ते काँक्रीटीकारणाच्या घोटाळा झाल्याचे विरोधकांचे आरोप फडणवीस यांनी फेटाळून लावले.
धारावीचा पुनर्विकास करताना तिथल्या व्यावसायिकांनाही व्यवसाय करण्यासाठी तिथेच जागा देण्यात येईल, असं फडणवीस यांनी सभागृहाला आश्वस्त केलं.
राज्यात गंभीर गुन्ह्यांमध्ये तीन टक्क्यांपेक्षा अधिक घट झाली असून दोषसिद्धीचं प्रमाण ४५ टक्क्यांपर्यंत पोहोचल्याचं त्यांनी सांगितलं. महिला अत्याचाराच्या

गुन्ह्यांमध्ये घट झाली आहे आणि महिलांसंदर्भात गुन्हे उघडकीला येण्याचं प्रमाण वाढल्याचं त्यांनी सांगितलं

मराठा आंदोलकांवरील गुन्हे मागे घेण्याचं काम वेगानं सुरू आहे. १७ हजार ४७१ पोलिसांची भर्ती झाल्यानंतर आणखी ९ हजार जागांसाठी जाहिरात काढली जाईल.अशी माहिती फडणवीस यांनी दिली.

येत्या विधानसभा निवडणुकीत राज्याची जनता महायुतीला पुन्हा एकदा संधी देईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. तसंच, विरोधकांनी दिलेल्या सूचना आणि त्यांनी केलेलं काम याबद्दल त्यांचे आभार मानले.

**<><><><><><>**

महायुती सरकारने सरकारी तिजोरीत खडखडाट केला, कर्ज आणून नव्या योजना आणल्या असा आरोप विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी आज विधानसभेत केला. अंतिम आठवडा प्रस्तावावर चर्चा करताना ते बोलत होते. मराठा आरक्षणासंदर्भात सगे सोयऱ्याना आरक्षण देण्याविषयी सरकारने भूमिका स्पष्ट करावी. त्यानंतर आम्ही आमची भूमिका जाहीर करू असं ते म्हणाले.

राज्यात सरकारने दावा केल्याप्रमाणे रोजगानिर्मिती झालेली नाही. लोकांच्या या फसवणुकीला जनतेच्या दरबारात तोंड द्यावं लागेल, असं वडेट्टीवार म्हणाले.

**<><><><><><>**

कर्करोगाविरोधातली बनावट इंजेक्शनं बाजारात आणल्या प्रकरणी पाच जणांवर गुन्हे दाखल करण्यात आले असून गुजरात - तेलंगणा आणि महाराष्ट्रामध्ये असलेल्या या टोळीचा तपास पोलिस करत आहेत, असं अन्न आणि औषध प्रशासन मंत्री धर्मराव बाबा अत्राम यांनी या संदर्भातल्या प्रश्नाला उत्तर देताना विधानसभेत सांगितलं . भाजपाचे भाई गिरकर यांनी याबाबतचा तारांकित प्रश्न विचारला होता. या बनावट इंजेक्शनची खरेदी विक्री करणाऱ्या पुण्याच्या डेक्कन

हेल्थकेअर या पेढीचा परवाना रद्द करण्यात आला असून इतर संबंधित औषध विक्रेत्यांसंदर्भात कारवाई सुरू असल्याचं त्यांनी सांगितलं.

<><><><><><>

राज्याल्या विविध घटकांना शैक्षणिक प्रवेशासाठी असणारी नॉन क्रिमीलेयरची आठ लाख रुपयांची वार्षिक उत्पन्नमर्यादा वाढवण्याचा प्रस्ताव केंद्र सरकारकडे पाठवण्यात आला आहे, अशी माहिती इतर मागास  बहुजन कल्याण प्रवर्ग विभागाचे मंत्री अतुल सावे यांनी आज विधानसभेत दिली. याबाबतची लक्षवेधी सूचना संजय गायकवाड, नितीन राऊत आणि इतरांनी उपस्थित केली होती.

<><><><><><>

मूळ अर्थसंकल्पातल्या तरतुदींइतका खर्च झालेला नसताना राज्य सरकारनं पुरवणी मागण्या मांडल्या. हे प्रकार टाळण्यासाठी योग्य अर्थसंकल्पीय मार्गांचा अवलंब करायला हवा असं निरीक्षण कॅग अर्थात नियंत्रक आणि लेखापालांच्या अहवालात नोंदवलं आहे. राज्याच्या वित्तव्यवस्थेचा २०२२-२३ आणि २०२३-२४ या दोन आर्थिक वर्षांचा अहवाल विधानसभेत आज सादर झाला. त्यात हे निरीक्षण नोंदवलं आहे.

राज्य सरकारच्या मालकीच्या सातत्यानं तोट्यात असलेल्या कंपन्यांचा कारभार सुधारत नसेल तर त्या कंपन्या बंद करण्याची शिफारसही कॅगनं केली आहे.

<><><><><><>

मुंबईतल्या विविध प्रकल्पांचं लोकार्पण तसंच भूमिपूजन करण्यासाठी उद्या प्रधानमंत्री नरेंद्र मोदी उद्या मुंबईत येणार आहेत. गोरेगाव इथल्या नेस्को प्रदर्शन केंद्रात २९ हजार ४०० कोटी रुपयांपेक्षा अधिक किमतीच्या रस्ते, रेल्वे आणि बंदर क्षेत्राशी संबंधित अनेक प्रकल्पांचं लोकार्पण आणि पायाभरणी मोदी यांच्या हस्ते होईल. गोरेगाव मुलुंड जोडरस्त्याचा जुळा बोगदा, ठाणे बोरिवली दरम्यानचा बोगदा

तसंच, नवी मुंबईतल्या तुर्भे इथं कल्याण यार्ड रिमॉडेलिंग आणि गती शक्ती मल्टी मॉडेल कार्गो टर्मिनल या प्रकल्पांची पायाभरणी प्रधानमंत्र्यांच्या हस्ते होईल. त्यानंतर प्रधानमंत्री लोकमान्य टिळक टर्मिनसवरच्या नवीन फलाटाचं लोकार्पण करतील. मुख्यमंत्री युवा कार्य शिक्षण योजनेचा शुभारंभ देखील प्रधानमंत्र्यांच्या हस्ते होणार असून संध्याकाळी ते भारतीय वृत्त सचिवालयातल्या आयएनएस टॉवर्सचं उद्घाटन करतील.

**<><><><><><>**

२५ जून हा दिवस **संविधान हत्या दिवस** म्हणून पाळण्याचा निर्णय केंद्र सरकारने जाहीर केला आहे. १९७५ साली याच दिवशी तत्कालीन प्रधानमंत्री इंदिरा गांधी यांनी देशात आणीबाणी जाहीर केली होती, त्याच्या स्मरणार्थ हा दिवस पाळण्यात येणार आहे. भारताचं संविधान पायदळी तुडवलं गेलं तेव्हा काय घडलं होतं, याची आठवण करून देणारा हा दिवस असेल असं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी याविषयी बोलताना म्हणाले. आणीबाणीमुळे ज्या लोकांना त्रास झाला त्यांच्यासाठी ही आदरांजली ठरले, असंही प्रधानमंत्री आपल्या समाजमाध्यमावरल्या संदेशात म्हणाले.

**<><><><><><>**

असमानता रोखण्यासाठी शिक्षण ही सर्वात प्रभावी परिवर्तनशील यंत्रणा आहे, असं प्रतिपादन उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनी आज मुंबईत केलं. नरसी मोनजी व्यवस्थापकीय शिक्षण संस्थेच्या विद्यार्थ्यांना ते मार्गदर्शन करत होते. या संस्थेनं गेल्या अनेक वर्षांपासून देशाचं भविष्य घडवण्याच्या कामात मोठा हातभार लावल्याबद्दल त्यांनी प्रशंसोद्गार काढले. वैदिक काळापासून भारताला उच्च शिक्षणाची मोठी परंपरा असून प्राचीन भारतातल्या महाविद्यालयांनी समाजाला दिशा देणारी मूल्यं जपली आहेत, असं ते म्हणाले.

**<><><><><><>**

मुंबई शेअर बाजाराच्या सेन्सेक्समध्ये आज ६२२ अंकांची वाढ झाली आणि तो ८० हजार ५१९ अंकांच्या विक्रमी उंचीवर बंद झाला. राष्ट्रीय शेअर बाजाराच्या निफ्टीमधे १८६ अंकांची वाढ होऊन तो २४ हजार ५०२ अंकांवर बंद झाला.

<><><><><><>

पुण्यात झिकाच्या रुग्णांची संख्या सातत्यानं  वाढत असून  खराडी भागातल्या दोन गर्भवतींना झिकाचा संसर्ग झाल्याची माहिती महापालिकेच्या आरोग्य विभागानं  दिली. त्यामुळे रुग्णांची संख्या १८ पर्यंत पोहोचली आहे.आत्तापर्यंत शहराच्या वेगवेगळ्या भागांतल्या  १० गर्भवतींना झिका विषाणूंचा संसर्ग झाल्याचं  आढळून आलं आहे.

<><><><><><>

येत्या दोन दिवसांत कोकणात बहुतांश ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता हवामानविभागानं व्यक्त केली आहे. तुरळक ठिकाणी खूप जोरदार पाऊस पडण्याची शक्यता असून यादरम्यान किनारपट्टीवर सोसाट्याचे वारे वाहतील, असा अंदाजही वर्तवला आहे.

मध्य महाराष्ट्र आणि विदर्भात बऱ्याच ठिकाणी मुसळधार पाऊस पडण्याचा अंदाज आहे. तुरळक ठिकाणी मेघगर्जनेसह विजांचा कडकडाटाची शक्यता आहे. मराठवाड्यातही काही ठिकाणी पावसाची शक्यताही विभागानं वर्तवली आहे.

//<><><><><>//